


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : २०६ वा | शुक्रवार दि ०३ ऑक्टोंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# भाईकडून मानाचं स्थान, तोंच नेता भाजपकडून ट्रॅप?

## देवाभाऊंची कॅबिनेट खेळी, संघर्षात कोणाचा बळी?

**वृत्तसंस्था/मुंबई**

गृहमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते अमित शहांनी २०२९ मध्ये भाजप स्वबळावर लढेल अशी घोषणा गेल्याच वर्षी केली. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शहा मुंबईत आले होते. त्यावेळी त्यांनी २०२९ साठीचे पक्षाचे इरादे स्पष्ट केले. तेव्हापासून भाजपच्या मित्रपक्षांमध्ये अस्वस्थता आहे. विरोधी पक्षांमधील अनेक महत्त्वाचे नेते, भविष्यात चांगली टक्कर देण्याची क्षमता असलेले चेहरे भाजपनं आपल्याकडे खेचण्यास सुरुवात केली. काही ठिकाणी भाजपनं आपल्या नेत्यांना मित्रपक्षांच्या आमदारांविरोधात ताकद देण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीत मुंबईत भाजपला मोठा धक्का बसला. भाजपला ३ पैकी केवळ १ जागा निवडून आणता आली नाही. पण विधानसभेला भाजपनं १५ जागा जिंकत मुसंडी मारली. आता भाजपनं महापालिकेसाठी तयारी सुरु केली. शिंदेसेनेनंदेखील पालिकेसाठी फिल्डींग लावली आहे. सहा लोकसभा मतदारसंघांची जबाबदारी सात नेत्यांकडे देण्यात आली आहे. यातील एका नेत्याची भाजपनं कोंडी करण्यास सुरुवात केली आहे. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी गेल्याच महिन्यात लोकसभा मतदारसंघांनुसार जबाबदाऱ्यांचं वाटप केलं. उत्तर मुंबईची जबाबदारी मागाठाण्याचे आमदार प्रकाश सुर्वेंकडे सोपवण्यात आली. ते तीन टर्मचे आमदार आहेत. २०१४ पासून त्यांनी सलग तीन निवडणुका जिंकल्या आहेत. आता त्यांच्या विरोधात भाजपनं विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर यांना ताकद दिली आहे. महाराष्ट्र स्वयंपुनर्विकास प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर त्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी प्रवीण दरेकर यांच्याकडे देण्यात आली. या पदाला कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आलेला आहे. यानंतर दरेकर समर्थकांनी मागाठाण्यात बॅनर लावले आहेत. दरेकर यांची सर्वाधिक ताकद मागाठाण्यात आहेत. २००९ मध्ये ते याच मतदारसंघातून मनसेच्या तिकिटावर निवडून येत आमदार झाले होते. तेव्हा त्यांनी प्रकाश सुर्वे यांचा पराभव केला होता. २०१४ मध्ये राज्यात सत्ताविरोधी लाट होती. वातावरण विरोधी पक्षांच्या बाजूनं होतं. त्याचा अंदाज घेत प्रकाश सुर्वे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. तर दरेकर पुन्हा मनसेच्या तिकिटावर लढले. त्यांचा धुव्वा उडाला. सुर्वे यांनी त्यांना पाणी पाजत आमदारकी मिळवली. पराभवानंतर ते राजकारणात बॅकफूटवर गेले. पण काळाची पावलं ओळखत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि तिथल्या ज्येष्ठांना, अनुभवी नेत्यांना, निष्ठावंतांना मागे टाकत विधान परिषदेची आमदारकी मिळवली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ते विरोधी पक्षनेतेही झाले. मागाठाणे मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ५ मधून प्रवीण दरेकर यांचे बंधू प्रकाश दरेकर नगरसेवक राहिले आहेत. त्यामुळे प्रवीण दरेकर राज्याच्या राजकारणात सक्रिय असताना मतदारसंघाच्या आघाडीवर त्यांचे बंधू कार्यरत असतात. उत्तर मुंबईत विधानसभेच्या ६ जागा



आहेत. त्यातील ४ जागांवर भाजपचे आमदार आहेत. तर प्रत्येकी एक जागा शिंदेसेना आणि काँग्रेसकडे आहे. काँग्रेसचा आमदार असलेला मालवणी मतदारसंघ मुस्लिमबहुल मानला जातो. तिथे दरेकर यांचं फारसं प्राबल्य नाही. त्यांची ताकद मागाठाण्यात आहे. एकीकडे एकनाथ शिंदे यांनी लोकसभेच्या ६ जागांसाठी ७ नेत्यांची निवड करत त्यांना पालिकेची जबाबदारी दिलेली आहे. यात प्रकाश सुर्वेंचा समावेश आहे. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या उत्तर मुंबईत कमाल करुन दाखवण्याचं आव्हान सुर्वेंसमोर आहे. त्यातच आता सुर्वे यांचे एकेकाळचे प्रतिस्पर्धी असलेल्या दरेकर यांना भाजपनं ताकद दिली आहे. शॉर्ट टर्ममध्ये पालिका आणि लाँग टर्ममध्ये विधानसभा अशी तयारी भाजपनं सुरु केल्यानं मागाठाण्यातील शिंदेसेनेत अस्वस्थता आहे.

## चार दिवसांपासून बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह दिवठाणा नदीत आढळला!

**जनसंचलन/ चिखली**

चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या चिखलीतील ४५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह दिवठाणा नदीत आढळून आला असून, हा प्रकार घातपात, अपघात की आत्महत्या याबाबतचे प्रश्न निर्माण झाले आहेत. मृतकाचे नाव दिलीप राजाराम मोरे (रा. रामानंद नगर, चिखली) असे आहे. दिलीप मोरे हे हॉटेल व्यवसायिक होते. २८ सप्टेंबर रोजी हॉटेलसाठी किराणा आणतो असे सांगून ते घरातून बाहेर पडले होते; मात्र त्यानंतर ते परतलेच नाहीत. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला, पण निष्फळ ठरल्याने ३० सप्टेंबर रोजी चिखली पोलिसात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. दरम्यान, १ ऑक्टोबर रोजी दिवठाणा येथील नदीपात्रात त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. अचानक



बेपत्ता झाल्यानंतर मृतदेह नदीत सापडल्याने शहरात आणि परिसरात खळबळ उडाली आहे. हा मृत्यू घातपातामुळे झाला की आत्महत्येमुळे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## बुलढाण्यात शेतमजुराचा विषप्राशनाने मृत्यू

**जनसंचलन/ बुलढाणा**

आर्थिक संकटामुळे नैराश्येत गेलेल्या गोशिंग तांडा (ता. नांदुरा) येथील ३५ वर्षीय शेतमजुराने विष प्राशन केले. जिल्हा सामान्य रुग्णलयात उपचारासाठी दाखल केल्यानंतर बुधवारी दुपारी त्याचा मृत्यू झाला. मृतकाचे नाव शिवलाल छगन शिंदे असे असून, तो शेतमजुरी करून उदरनिर्वाह करत होता. ३० सप्टेंबर रोजी सकाळी तो यशवंतराव सावंत यांच्या शेतात फवारणीसाठी गेला होता. काम संपल्यानंतर त्याने शेतातच विषारी औषध प्राशन केले. घटनेची माहिती नातेवाईकांना कळताच त्यांनी त्याला प्रथम मोताळा येथील रुग्णालयात नेले; मात्र प्रकृती गंभीर झाल्याने पुढे बुलढाणा जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचार सुरू असताना बुधवारी दुपारी त्याचा मृत्यू झाला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा डाक कार्यालयातर्फे राष्ट्रीय टपाल सप्ताहाचे आयोजन




वृत्तसंस्था/ बुलढाणा

बुलढाणा डाक विभागात ६ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राष्ट्रीय टपाल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामध्ये डाक विभागाच्या प्रवासाबाबत, नविन बदलांविषयी जनजागृती तसेच विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. यावेळी शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून नागरिकांमध्ये डाक विभागाविषयी जनजागृती होणार आहे. डाक विभागाच्या विविध योजनांचा लाभ सर्वांनी घ्यावा तसेच राष्ट्रीय टपाल सप्ताहामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन गणेश आंभोरे, डाक अधीक्षक, बुलडाणा विभाग यांनी केले आहे.

# महाराष्ट्र अधोविश्वात अव्वल

## संपादकीय लेख




राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (एनसीआरबी) ताज्या अहवालात एकूण गुन्हेगारी आणि त्यात वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यांची वाढती संख्या, ही महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपासून ते सायबर गुन्हे आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्येही महाराष्ट्राचे स्थान पहिल्या काही राज्यांमध्ये आहे. सन २०२३ मध्ये देशात झालेल्या एकूण एक लाख ७१ हजार आत्महत्यांपैकी १०७८६ आत्महत्या या शेतकरी व शेतमजुरांच्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील प्रमाण सर्वाधिक (३८.५ टक्के) असून कर्नाटकातील प्रमाण २२.५ टक्के आहे. नापिकी, कर्जबाजारीपणा आणि ठोस सरकारी धोरणांचा अभाव, ही परिस्थिती बदलत नसल्याने शेतकरी जीवन संपवत असल्याचे दिसून येते. त्यासोबतच विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, हा साऱ्या देशासाठी चिंतेचा विषय ठरू पाहत आहे. वर्षभरात १३ हजार ८९२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या असून वाढती स्पर्धा, समाजमाध्यमांचा अतिवापर, पालकांचा दबाव आणि अपयशातून येणारे वैफल्य ही त्यामागील कारणे दिसून आली आहेत. दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या संख्येतही महाराष्ट्राचा क्रमांक उत्तर प्रदेशानंतर दुसरा असून या वर्षभरात राज्यात पाच लाख ९६ हजार गुन्हे दाखल झाले. तसेच गुन्हेगारी दरातही (क्राइम रेट) महाराष्ट्राचे स्थान वर दिसून येते. राज्यात हे प्रमाण प्रतिलाख लोकसंख्येत ४७०.४ इतके असून, ते राष्ट्रीय सरासरीपेक्षा (४४८.३) अधिक आहे, ही खचितच चिंतेची बाब. दुसरीकडे भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. भ्रष्टाचाराच्या चार हजार गुन्ह्यांपैकी सर्वाधिक, ७६३ गुन्हे महाराष्ट्रात असून त्यानंतर राजस्थान, मध्य प्रदेश, तमिळनाडू आणि उत्तर प्रदेशाचा क्रमांक लागतो. आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये घट झाली असली, तरी देशात पहिला क्रमांक कायम ठेवणे, ही आर्थिक राजधानी मुंबईसाठी धोक्याची घंटाच आहे. सायबर गुन्ह्यांची संख्या ही महाराष्ट्रासोबतच देशासाठी काळजीचा विषय ठरत आहे. सन २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये या गुन्ह्यांमध्ये तब्बल ३१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. नवनवे तंत्रज्ञान हाती येऊनही ते वापरण्याचे शहाणपण अद्याप येत नसल्याचेच हे निदर्शक आहे. या अहवालाने आकडेवारीची तुलना करून संबंधित राज्यांपुढे आरसा धरला आहे. त्या पलीकडे जाऊन पुण्या-मुंबईतील टोळीयुद्धाचे वाढते प्रकार आणि सर्वसामान्यांना त्रस्त करणारे रस्त्यांवरचे गुन्हे कमी होतील, तेव्हाच त्यांचा व्यवस्थेवर विश्वास बसेल.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# दोन मुलांना संपवलं, मग पत्नी अनब दोन लेकींसह स्वत:ला पेटवलं; संपूर्ण कुटुंब राख, नेमकं काय घडलं?

**लखनऊ :** पेरणी करण्यास नकार दिल्याने एका व्यक्तीने दोन मुलांची धारदार शस्त्राने वार करत हत्या केली. त्यानंतर त्याने पत्नी आणि दोन मुलींसह स्वत:ला पेटवून घेतलं. या भयंकर घटनेत सह जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. उत्तर प्रदेशातील बहराइचमध्ये निंदुरपुरवा तेप्राहा गावात ही घटना घडल्याची माहिती आहे.या घटनेची माहिती पोलीस आणि अग्निशमन दलाला देण्यात आली. आग विझवली आणि दरवाजा तोडला मात्र तोपर्यंत सारं खाक झालेलं होतं. घरात विजय कुमार (४५), त्याची पत्नी धीरज कुमारी (३०), मुलगी प्रियांशी (८) आणि रियाशी (६) यांचे जळालेले मृतदेह आढळले. रामगाव पोलिसांनी विजयचे भाऊ मनोज आणि अजय यांना ताब्यात घेतले आहे आणि त्यांची चौकशी सुरू केली आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, एक वर्षापूर्वी एका रस्ते अपघातात मुलाचा मृत्यू झाल्यापासून विजय मानसिकदृष्ट्या अस्थिर होता. तो त्याच्या पत्नी आणि मुलींना सतत मारहाण करायचा.विजय मूळचा बिहारच्या भागलपूर जिल्ह्यातील नवगछिया येथील होता. तो २२ वर्षांपूर्वी येथे राहायला आला होता, त्याने सुमारे पाच एकर जमीन खरेदी केली आणि शेती सुरू केली. त्याने इतर गावकऱ्यांकडून जमीन भाड्याने घेतली. त्याचे दोन्ही भाऊही येथेच राहतात.बुधवारी सकाळी विजयने गावातील रहिवासी सूरज यादव (१४), सनी वर्मा (१३) आणि किशन यादव (१५) यांना लसूण पेरण्यासाठी आपल्या घरी बोलावले. महानवमी असल्याने सूरज आणि सनी



काम करण्यास नकार देत होते. वादावेळी विजयने किशनला लाकूड तोडण्यासाठी बाहेर पाठवले. त्यानंतर संतापलेल्या विजयने सूरज आणि सनीवर अंगणात चाकूने वार केले ज्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याने स्वत:ला आणि गुरांसह संपूर्ण कुटुंबाला एका खोलीत बंद केले आणि स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरने आग लावून घेतलीआग लागल्यावर पत्नी आणि मुलींनी आरडाओरड केली. आवाज ऐकून गावकरी घटनास्थळी धावले, परंतु अंगणात रक्ताच्या थारोळ्यात पडलेले सूरज आणि सनी यांचे मृतदेह पाहून ते घाबरले. काही वेळातच, रामगाव पोलिस आमि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले आले. दरवाजा तोडून आग आटोक्यात आणण्यात आली, परंतु तोपर्यंत आत अडकलेले संपूर्ण कुटुंब आणि जनावरे यांचा मृत्यू झाला होता.

सूरज हा त्याच्या कुटुंबाचा एकुलता एक मुलगा होता. मुलाच्या हत्येची बातमी मिळताच, त्याचे आजोबा गुरुवचन घटनास्थळी आले आणि मृतदेहाजवळ बसून आक्रोश करु लागले. तर, वडील लक्षीराम आणि आई यांनीही एकच टाहो फोडला. धीरज कुमारी विजयची दुसरी पत्नी होती. विजयच्या पहिल्या पत्नीचा १० वर्षांपूर्वी मृत्यू झाला होता.

## मुंबईत ३५ वर्षीय महिलेन हनी ट्रॅपद्वारे व्यापाऱ्याला भुलवलं


**मुंबई :** मुंबईमध्ये महिलांची एक हनी ट्रॅप गँग पुरुषांना फसवून लुटत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नुकत्याच घडलेल्या घटनेत, एका ४६ वर्षीय व्यापाऱ्याला शारीरिक सुखाचं आमिष दाखवून तब्बल ३५ हजार रुपये लुटल्याचा प्रकार समोर आला आहे. हा व्यापारी मूळचा जळगावचा असून, व्यवसायानिमित्त तो वारंवार मुंबईला येत असे. २३ सप्टेंबर रोजी तो व्यापारासंबंधी कामासाठी मुंबईला आला होता. सीएसएमटी स्थानकावर पोहोचताच त्याची भेट एका अनोळखी महिलेशी झाली. बोलता बोलता तिने त्याच्याशी जवळीक साधली आणि ५०० रुपयांच्या बदल्यात शारीरिक सुख देण्याचं आमिष दाखवलं.व्यापाऱ्याने प्रस्ताव मान्य केल्यानंतर ती महिला त्याला टॅक्सीने गिरगाव परिसरात घेऊन गेली. भारत भवन हॉटेलजवळ असलेल्या एका इमारतीत ती त्याला वरच्या मजल्यावरील खोलीत घेऊन गेली. व्यापाऱ्याने आत पाऊल टाकताच त्याला अजून एक महिला दिसली. क्षणातच त्या महिलेनं आरडाओरड सुरू केली आणि व्यापारी तिचा व्हिडिओ काढत असल्याचा आरोप केला.दरम्यान, आणखी तीन महिला खोलीत शिरल्या. त्यांनी व्यापाऱ्याला धमकावत त्याच्याकडून ऑनलाईन २२ हजार रुपये ट्रान्सफर करून घेतले, तसेच त्याच्या पाकिटातील १३ हजार रुपयेही बळजबरीने घेतले.या घटनेनंतर व्यापाऱ्याने ३० सप्टेंबर रोजी व्ही. पी. रोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत ऑनलाईन ट्रान्सफरची पडताळणी केली आणि घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज जप्त केले. फुटेजच्या आधारे तीन महिलांना अटक करण्यात आली आहे.

ङ्गआम्हाला संशय आहे की या टोळीने अशाच पद्धतीने आणखी काही पुरुषांना लक्ष्य केलं असावं. काही पीडित सामाजिक कलंकाच्या भीतीने पुढे येत नसावेत, असं पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितलं.

## घरगुती वाद टोकाला, आधी बायकोला संपवलं, नंतर स्वत:च्या आयुष्याची दोर कापली

**पुणे :** दौंड तालुक्यातील रावणगाव (रानमळा वस्ती परिसरात) काल थरारक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. पतीने स्वत:च्या पत्नीचा गळा दाबून खून केला आणि काही वेळातच राहत्या घरात सिलिंग फॅनला गळफास घेऊन स्वत:ने आत्महत्या केली. या दुहेरी मृत्यूनं गावात मोठी खळबळ उडाली आहे. मृत्यूमुखी पडलेले दाम्पत्यामध्ये खून झालेल्या पत्नीचं नाव जयश्री अशोक गावडे (वय ४५) असून तिच्या खुनानंतर पती अशोक मारुती गावडे (वय ५०) याने देखील आत्महत्या केली.

या घटनेनं सगळीकडे खळबळ उडाली असून या अनपेक्षित घटनेनं गावकऱ्यांना धक्का बसला आहे. दोघेही शेती करून उदरनिर्वाह करत होते. त्यांच्यापश्चात दोन मुले आहेत.या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दसरा सणाच्या पूर्वसंध्येला, घरातच पती-पत्नीमध्ये जोरदार वाद झाला. मध्यरात्रीच्या सुमारास या वादातून अशोक गावडे यांनी पत्नी जयश्रीचा गळा दाबून खून केला. त्यानंतर काही वेळातच अपराधगंडामुळे किंवा संतापातून अशोक यांनी राहत्या घरातील फॅनला गळफास घेऊन जीवन संपवलं. सकाळी गावकऱ्यांना ही घटना समजताच एकच खळबळ उडाली. ऐन सणासुदीत अशा घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली. घटनेची माहिती मिळताच दौंड पोलिस ठाण्याचे



निरीक्षक गोपाळ पवार यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून दोन्ही मृतदेह ताब्यात घेतले. घटनेमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालं नसलं तरी पती-पत्नीतील कौटुंबिक वाद हा प्राथमिक अंदाज आहे. दौंड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अशोक व जयश्री हे साधे-सरळ आयुष्य जगत होते. मात्र, घरगुती कारणावरून वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर येत आहे. दसऱ्यासारख्या मंगलदिनी अशी शोकांतिका घडली, याची हळहळ प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत आहे.

## गुप्तांग दुखू लागल्यानं लेकीला रडू कोसळलं; आईला सांगितला धक्कादायक प्रकार; काकानं कडी लावली अन..

**धुळे :** धुळे जिल्ह्यात तीन वर्षीय चिमकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची संतापजनक घटना घडली असून चुलत काकानेच नात्याला काळीमा फासल्याची घटना घडली आहे. घटनेनंतर संतप्त गावकऱ्यांनी काल सोनगीर पोलीस स्टेशनवर मोर्चा काढत आरोपी मयुर माळीवर फास्ट्रॅक कोर्टात खटला चालवत फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

मोर्चात मोठ्या प्रमाणात महिलांचा देखील सहभाग होता. सोनगीर पोलिसांनी घटनेनंतर तात्काळ आरोपी मयुर माळीला अटक केली आहे.नवरात्रौत्सवात देवीची पूजाअर्चा केली जाते. पण याच नवरात्रौत्सवात काकानेच पुतणीचे लचके तोडले आहेत. याप्रकरणी पीडितेच्या



आईने सोनगीर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीत नमूद केलं की, 'सायंकाळच्या सुमारास एक दुधवाला आला असता, सासू दुध घेण्यासाठी गेल्या, तेव्हा माझी तीन वर्षांची मुलगी देखील गेली होती. थोड्यावेळानंतर सासुबाई घरात आल्या तेव्हा त्यांनी मुलीबाबत विचारल्यानंतर त्यांनी सांगितलं की, ती चुलत काका मयूर माळी आला होता, तो तिला खेळविण्यासाठी त्याच्या घरी घेऊन गेला होता. थोड्यावेळानंतर ती घरी आली रात्री झोपण्याची तयारी करताना लहान पीडिता मुलगी रडू लागली होती. तेव्हा काय झालं? असं विचारलं. तेव्हा तिचं गुप्तांग दुखू लागलं होतं. लहान मुलीने रडत घडलेला सर्व प्रकार सांगितला.

शेजारीच राहणाऱ्या नराधम चुलत काकाने त्याच्या घरी नेलं आणि आतून कडी लावली. बाहेर एक बाबा आला आहे असं त्यानं तिला सांगितलं. त्यानंतर तिच्यावर जबरदस्ती केली. त्यानंतर चिमुकलीनं घडलेला हा सर्व प्रकार सांगितला. संतप्त सोनगीर ग्रामस्थांनी पोलिस ठाण्यावर मूक मोर्चा काढून नराधम काकाला फाशीची शिक्षा देण्याची जोरदार मागणी केली.

## एकतर्फी प्रेमात प्रेयसीचा खून करुन आत्महत्या

**हैदराबाद :** लहानपणापासून ज्या मुलीवर एकतर्फी प्रेम करत होता, तिचा पाठलाग करुन तरुणाने आधी तिची ब्लेडने गळा चिरुन हत्या केली, त्यानंतर तरुणानेही आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना बुधवारी आंध्र प्रदेश येथील काकीनाडा जिल्ह्यातील समरलाकोटा मंडल परिसरात घडली.पेद्दापुरमचे डीएसपी श्रीहरिराजू यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोल्लाप्रोलू मंडल येथील दुर्गाडा येथील १८ वर्षीय जी. दीप्ती काकीनाडा येथे इंटरमिजिएटचे शिक्षण घेत होती. त्याच गावातील १९ वर्षीय के. अशोक हा तिच्यावर प्रेम असल्याचा दावा करत असे. मंगळवारी अशोक दीप्तीकडे गेला आणि तिला पानसापाडू येथील गदेरु कालव्याच्या बंधाऱ्यावर घेऊन गेला. तिथे त्याने तिचा गळा ब्लेडने कापून तिची हत्या केली. तिथून त्याने हुसेनपुरमजवळ ट्रेनखाली उडी मारून आत्महत्या केली.

# घराशेजारी दसरा मेळावा असताना राज ठाकरे आले नाहीत, संजय राऊत म्हणाले, 'पलिकडचं शिवतीर्थ...'

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा आज पार पडला. हा दसरा मेळावा अतिशय भव्यदिव्य होणार अशी चर्चा होती. या दसरा मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे देखील उपस्थित राहणार अशी चर्चा होती. दोन्ही बंधू एकत्रित शक्ती प्रदर्शन करणार अशी चर्चा होती. पण तसं काहीच घडलं नाही. त्यामुळे राज ठाकरे हे उद्धव ठाकरे यांच्यासोबत राजकीय युती करणार की नाहीत? याबाबत संभ्रम निर्माण झाला. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात राज ठाकरे यांच्यासोबत युती करणार का? यावर भाष्य केलं. आम्ही दोन्ही भाऊ एकत्र येण्यासाठी एकत्र आल्याचं आपण याआधीच बोलल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले.

त्याआधी संजय राऊत यांनी राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानाचा उल्लेख करत महत्त्वाचं वक्तव्य केलं. शिवसेनाप्रमुख बाळासाहे ठाकरे यांचं आपल्याकडे लक्ष आहे. ६८ वर्षांपूर्वी



शिवसेना प्रमुखांनी शिवसेनेची जी ठिणगी टाकली त्याचा हा पेटलेला वणवा मुसळधार पावसात सुद्धा विझू शकत नाही हे आपला संपूर्ण देश पाहतोय. आतापर्यंत नेत्यांची भाषण झाली की मग पाऊस पडता. पण या इथे पाऊस, वादळ असताना हा मेळावा आपण करतोय आणि हजारोंच्या संख्येने आपण इथे जमलेला आहात. हे शिवतीर्थ आपलं आहे आणि शिवतीर्थ फक्त आपल्या शिवसेनेचं आहे. या शिवतीर्थाच्या पलिकडे आणखी एक शिवतीर्थ आहे. ते सुद्धा आपलंच मानायला पाहिजे', असं संजय राऊत म्हणाले.हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुखांनी ज्या शिवसेनेची स्थापना या शिवतीर्थावर केली, त्या शिवसेनेचा दसरा मेळावा ही महाराष्ट्राची परंपरा आहे. मराठी माणसाची भक्कम एकजूट ज्या शिवसेनाप्रमुखांनी केली त्या शिवसेनेला हादरे देण्याचा प्रकार कुणी कितीही केला तरी त्या हाद□यामध्ये आपण संपून जाणार आहात. मला आज अनेकांनी प्रश्न विचारले, शंका उपस्थित केल्या. शिवतीर्थावर चिखल झालेला आहे म्हणजे तुम्ही चिखलफेकच करणार. मी म्हटलं, होय. गद्दारांवर चिखलफेकच करणार. त्यांची तीच लायकी आहे', असा घणाघात संजय राऊत यांनी केला.संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ आहे. मराठवाडा संपूर्ण पाण्यात आणि चिखलात आहे. आठ-आठ दिवस शेतकरी चिखलात आहे. आपण दोन तास पाण्यात आणि चिखलात ही सभा घेतली तर आपल्याला वाईट वाटण्याचं कारण नाही. महाराष्ट्रात ओला दुष्काळ असेल तर हा आमचा ओला दसरा मेळावा आहे', असं संजय राऊत म्हणाले. रावणाचा आज अंत करायचा आहे. नेहमी रावणाचं दहन होतं. आता या पावसात रावणाचं दहन कसं करायचं, रावणाला जाळायचं की रावणाला बुडवायचं हा विचार करावा लागेल. या मुंबईत पाऊस आहे. या मुंबईत रावणाला बुडवायचा आणि दिल्लीतल्या रावणाला जाळायचा', असं राऊत म्हणाले.उद्धव ठाकरेंनी शस्त्र पूजा केली आहे. शस्त्रपूजा करण्याचा अधिकार हा हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला आहे. मला विचारलं गद्दारांच्या मेळाव्यात पूजणार? मी म्हटलं त्यांना शस्त्र पूजा करण्याचा अधिकार असूच शकत नाही. मग ते काय पूजणार? मला सांगण्यात आलं, त्यांनी दिल्लीतून अमित शाह यांचे जोडे आणले आहेत. चपला आणल्या आहेत. त्यांचं पूजन ते करणार आहेत. आम्ही शस्त्र पूजा केली. ते अमित शाह यांच्या पादुकांच्या पूजा करत आहेत. जो तो आपल्या लायकीनुसार वागतो आणि जगतो. हा निष्ठावंतांचा मेळावा आहे', असं भाषण संजय राऊत यांनी केलं.

# हाती 'घड्याळ' बांधताच बड्या नेत्याला राष्ट्रवादीकडून मोठी जबाबदारी

**नाशिक :** उपमुख्यमंत्री अक्षळीं झुरी यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रदेश प्रवक्तेपदी डॉ. हेमलता पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी या संदर्भातील नियुक्तीपत्र डॉ. पाटील यांना प्रदान केलं आहे. वर्षभराच्या कालावधीतच हा त्यांचा तिसरा पक्ष ठरला आहे.डॉ. हेमलता पाटील यांनी दीड महिन्यापूर्वीच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यापूर्वी कॉंग्रेसच्या प्रदेश प्रवक्त्या राहिलेल्या डॉ. पाटील यांना गेल्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारी नाकारली गेल्याने त्या कॉंग्रेस पक्षावर नाराज झाल्या होत्या. नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातून उमदवारी न मिळाल्याने त्यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली. माध्यमांशी संवाद साधताना त्यांची नाराजी अश्रूवाटे बाहेर पडली होती. नाना पटोले त्यावेळी महाराष्ट्र कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद भूषवत असल्याने पाटलांचा रोख त्यांच्याकडेच होता.विधानसभा निवडणुकीनंतरही कॉंग्रेसने नाराजीची दखल न घेतल्याने त्यांनी ११ फेब्रवारी २०२५ रोजी कॉंग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस पदासह प्रवक्तेपदाचा राजीनामा दिला.



त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत थेट राजधानी दिल्लीतच शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. परंतु, शिंदे गटाने दिलेली आश्वासने न पाळल्यानं पाटील तिथेही खट्टू झाल्या.शिवसेना पक्षातील अंतर्गत गटबाजीवर आसूड ओढत हेमलता पाटील यांनी शिंदे गटालाही अल्पावधीतच रामराम ठोकला होता. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात त्यांनी अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे 'घड्याळ' हाती बांधलं.आगामी नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हेमलता पाटील यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे दिसते. महापालिका निवडणुकीत पाटलांच्या प्रवेशाने राष्ट्रवादीला नाशिकमध्ये बळ मिळण्याचे संकेत मिळत आहेत.प्रसार माध्यमांमध्ये पक्षाची अधिकृत भूमिका आणि विचार मांडण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रदेश प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आल्याचं प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी नियुक्तिपत्रात नमूद केलं आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत त्या पक्षाचा आवाज बुलंदपणे मांडताना दिसण्याची अपेक्षा आहे.

# ठाकरेंना दसऱ्याला धक्का; राणेंच्या विरोधकानं साथ सोडली

**मुंबई :** ; वर्षभरात तिसऱ्या पक्षात उडी : दसरा मेळाव्याच्या दिवशी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. तळकोकणातील महत्त्वाच्या नेत्यानं ठाकरेंची साथ सोडली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्ष सोडून ठाकरेंकडे आलेल्या राजन तेली यांनी ठाकरेंना जय महाराष्ट्र केला आहे. थोड्याच वेळात ते शिंदेसेनेत प्रवेश करतील. मुंबईच्या गोरेगावात असलेल्या नेस्को सेंटरमध्ये शिंदेसेनेचा दसरा मेळावा होत आहे.राजन तेली यांनी शिवसेनेतून त्यांच्या राजकारणाला सुरुवात केली. नारायण राणेंनी शिवसेना सोडल्यावर राजन तेली यांनीदेखील पक्ष सोडला. पुढे ते भाजपमध्ये गेले. सावंतवाडी विधानसभा मतदारसंघाचे प्रभारी म्हणून त्यांनी काम केलं. ते २०२४ मध्ये झालेली विधानसभा निवडणूक लढण्यास उत्सुक होते. पण इथले विद्यमान दीपक केसरकर शिंदेसेनेचे असल्यानं महायुतीत ही जागा भाजपला मिळाली नाही. त्यामुळे राजन तेली यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत शिवसेना उबाठामध्ये प्रवेश केला.सावंतवाडीत यंदा दोन शिवसेनांमध्ये लढत झाली. शिंदेसेनेच्या दीपक केसरकर यांनी ठाकरेसेनेच्या राजन तेली यांचा ३९ हजार ८९९ मतांनी पराभव केला. तेली यांना ४१ हजार १०९ मतं मिळाली. त्याआधी म्हणजेच २०१९ मध्येही तेली यांनी केसरकर यांच्याविरोधात निवडणूक लढले होते. अपक्ष लढत तेली यांनी ५६ हजार ५५६ मतं घेतली होती. त्यावेळी केसरकर १३ हजार २२८ मतांनी जिंकले होते.२०१४ मध्ये शिवसेना आणि भाजप ची युती तुटली होती. त्यावेळीही शिवसेनेकडून दीपक केसरकर विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात होते. त्यावेळी केसरकर यांनी ७० हजार ९०२ मतं मिळवली. तर भाजपकडून निवडणूक लढलेल्या राजन तेली यांनी २९ हजार ७१० मतं घेतली होती.

# खेडेकर शिवसेनेत जाणार?

## उदय सामंत म्हणाले, मी हमी देतो..



**रत्नागिरी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे कोकणातील एकेकाळचे खंदे समर्थक आणि राज ठाकरे यांनी मनसेतून बडतर्फ केलेले वैभव खेडेकर यांचा तब्बल दोन वेळा रद्द झालेला भाजपप्रवेश राजकीय वर्तुळात सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. याबद्दल आता शिवसेना नेते आणि रत्नागिरीचे पालकमंत्री असलेले उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मोठं विधान केलं आहे. एखाद्या कार्यकर्त्याचा पक्षप्रवेश हा तीन-तीन वेळा रद्द होणं हे खच्चीकरण केल्यासारखं असल्याचं सामंत म्हणाले.वैभव खेडेकर समाजामध्ये तळागाळात जाऊन काम करणारं व्यक्तिमत्व आहे. ते माझे अतिशय जवळचे मित्र आहेत, पण त्यांचा पक्षप्रवेश तीन वेळा का रद्द झाला हे मला पण कळलेलं नाही. पण माझं एक राजकीय मत सांगतो, की अशा पद्धतीने पक्षप्रवेश रद्द होणं म्हणजे एखाद्या कार्यकर्त्याचं खच्चीकरण आहे. ते होऊ नये हीच माझी भूमिका आहे. त्यांनी कुठच्या पक्षात जावं, हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे आहे, अशी भूमिका उदय सामंत यांनी मांडली. पण तीन वेळा एखाद्या कार्यकर्त्याचा पक्षप्रवेश रद्द होणं हे एखाद्या कार्यकर्त्याच्या मनाला लागत असल्याचाही पुनरुच्चार त्यांनी केला.वैभव खेडेकर तुमच्या शिवसेनेत आले तर आपण पक्षप्रवेश करून घेणार का? असा प्रश्न पत्रकारांनी उदय सामंत यांना यावेळी विचारलं असता, ते म्हणाले की आपण भाजपबद्दल बोलतो आहोत, खेडेकर भाजपात चालले आहेत ना, मग त्यांच्याजवळ तुम्ही बोला, ते इथे येतात का बघा आणि मला सांगा, असं सूचक विधान उदय सामंत यांनी केलं आहे.

वैभव खेडेकर हे तुमच्याकडे येत आहेत, असे तर हे संकेत नाही ना? असा प्रश्न विचारताच उदय सामंत पुन्हा म्हणाले की तुमची त्यांची ओळख असेल, तर तुम्ही बोला त्यांच्याजवळ, ते येणार असतील, तर माझी भेट घालून द्या, मग निर्णय घेतो, पण पक्षप्रवेश असा तीन वेळा रद्द होणार नाही याचीही हमी देतो, असेही मोठे वक्तव्य उदय सामंत यांनी रत्नागिरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे.

चिपळूण येथील उद्योगपती व शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून विधानसभा निवडणूक लढवलेले प्रशांत यादव तुमच्या हातातून कसे काय सुटले, असा मिश्कील प्रश्न पत्रकारांनी विचारताच सामंत म्हणाले की 'सोडले'. शेवटी कोणाला घ्यायचं आणि कोणाला सोडायचं एवढं राजकीय ज्ञान तर मला नक्कीच आहे ना, असाही टोला उदय सामंत यांनी लगावला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ट्रॉफी भारतात आणण्यासाठी पहिलं पाऊल..

**दुबई :** नवी दिल्ली : आशिया कपच्या ट्रॉफीवरून सध्या मोठा वाद सुरू आहे. आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी भारतीयांना थेट आव्हान दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, जर भारतीयांना ट्रॉफी हवी असेल, तर त्यांनी तो आशियाई क्रिकेट परिषदेच्या कार्यालयातून माझ्याकडून घेऊन जावा. नक्वी यांनी भारतीयांची माफी मागितल्याचा दावाही फ ेटाळला आहे. या सगळ्यामुळे भारतीय क्रिकेट बोर्ड खूप संतापले आहे. आता हा वाद वेगळे वळण घेणार आहे. कारण आशिया कप ट्रॉफी भारतामध्ये आणण्यासाठी बीसीसीआयने आता पहिलं पाऊल उचललं आहे.

**मोहसीन नक्वींचा अहंकार मोडणार**

मोहसीन नक्वी हे सध्या पाकिस्तानचे अंतर्गत सुरक्षा मंत्री आहेत. ते पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचेही अध्यक्ष आहेत. त्यांनी 'एक्स'वर म्हटले आहे की, मी आशिया कपची ट्रॉफी देण्यासाठी नेहमीच तयार होतो. स्पर्धेच्या अंतिम सामन्याच्या दिवशीही त्यांची तयारी होती. ही तयारी आजही कायम आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. नक्वी म्हणाले, 'भारतीयांनी आशियाई क्रिकेट परिषदेच्या कार्यालयातून माझ्याकडून करंडक घेऊन जावा.' पण भारताने या गोष्टीला आपला विरोध कायम ठेवला आहे. पण तरीही आशिया कपची ट्रॉफी भारतात आणायची तरी कशी, यासाठी बीसीसीआयने आता एक मोठं पाऊल उचललं आहे.बीसीसीआयचे म्हणणे आहे की, ' पाकिस्तानच्या मोहसिन नक्वी यांच्या हातून आशिया कपची ट्रॉफी घ्यायची नाही, हा निर्णय भारत सरकारचा किंवा बीसीसीआयचा नव्हता.









हा निर्णय भारताच्या खेळाडूंनी घेतला होता. दुसरी गोष्ट म्हणजे मोहसिन नक्वी हे आशियाई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष आहेत. पण आशिया कपची फायनल झाल्यावर त्यांनी ट्रॉफी संघटनेच्या कार्यालयात ठेवायला हवी होती, पण ते आपल्या हॉटेलमधील रुमवर ती ट्रॉफी घेऊन गेले. आशिया कपची ट्रॉफी ही काही मोहसिन नक्वी यांची प्रॉपर्टी नाही. त्यामुळे आता जर आशिया कपची ट्रॉफी हवी असेल तर त्यासाठी आम्ही आता पहिले पाऊल उचलले आहे. आम्ही आता याबाबत कायदेशीर तज्ञांती मदत घेत आहोत, जेणेकरून कायदेशीर लढाई करून आम्हीला ट्रॉफी मिळवता येऊ शकते. 'भारताला आशिया कपची ट्रॉफी मिळवायची आहे आणि आता बीसीसीआयने त्यासाठी पहिलं पाऊल उचललं. आहे.

---

# डॉक्टरांनी सांगितले कॅन्सर रोखणारे ६ असरदार उपाय

**कॅन्सर हा केवळ अनुवंशिक दोषांमुळे होतो असं आपल्यापैकी बहुतेकांना वाटतं. पण बोस्टन कॉलेजचे जीवशास्त्र प्राध्यापक आणि कॅन्सर संशोधक डॉ. थॉमस सायफ्रिड यांनी गेली तीन दशके केलेल्या संशोधनानुसार, हा आजार मोठ्या प्रमाणावर चयापचयाशी संबंधित आहे. त्यांच्या मते, आपण काय खातो, कधी खातो आणि कशी जीवनशैली जगतो, याचा कॅन्सर पेशींच्या वाढीवर थेट परिणाम होतो. त्यांनी सिद्ध केलं आहे की कॅन्सर पेशी मुख्यत्वे ग्लुकोजवर अवलंबून असतात आणि आहार–जीवनशैलीत बदल करून आपण त्यांना नैसर्गिकरित्या कमकुवत करू शकतो.**





■ हा दृष्टिकोन उपचारांना पर्याय नसून उपचारांना पूरक आहे. शरीरात असं वातावरण निर्माण करा जिथे कॅन्सर सहज वाढू शकणार नाही, हा यामागचा हेतू आहे. अनेकदा आपण आजारावर लक्ष केंद्रित करतो, पण शरीराची आतून रोगप्रतिकारक शक्ती वाढवणं तितकंच महत्त्वाचं असतं. डॉ. सायफ्रिड यांनी दिलेल्या काही सवयी साध्या असल्या तरी त्यांचा परिणाम खोलवर होतो. या सवयी अवलंबल्याने शरीराचा चयापचय दर सुधारतो, पेशींना योग्य पोषण मिळतं आणि कॅन्सर पेशींना प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते. चला, त्यांच्या सहा म हत्त्वाच्या उपायांबद्दल जाणून घेऊया.

■ डॉ.थॉमस सायफ्रिड यांच्या मते, कॅन्सर पेशी ग्लुकोजवर अवलंबून असतात. त्यामुळे रक्तातील साखरेचा स्तर स्थिर ठेवला, तर त्यांच्या उर्जेचा स्रोत कमी होतो. साखर, पांढरे पीठ, पॅकेज्ड स्नॅक्स यांचा वापर टाळा व त्याऐवजी भाज्या, प्रथिने, आणि आरोग्यदायी चरबी (नट्स, बिया, अवोकाडो, ऑलिव्ह तेल) यांचा आहारात समावेश करावा. अशा आहाराने इन्सुलिनची पातळी संतुलित राहते, सूज कमी होते आणि शरीराचा चयापचय आरोग्यदायी दिशेने जातो.

### केटोजेनिक आहाराने कॅन्सर पेशींना अडथळा

केटोजेनिक आहार म्हणजे कमी कार्बोहायड्रेट आणि जास्त आरोग्यदायी चरबी असलेला आहार. यामुळे शरीर ग्लुकोजऐवजी 'केटोन'चा ऊर्जा स्रोत म्हणून वापर करू लागते. डॉ. सायफ्रिड सांगतात की कॅन्सर पेशींना केटोन वापरणं कठीण जातं, त्यामुळे त्यांची वाढ मंदावते. अवोकाडो, सुकामेवा, बिया, पालेभाज्या, ऑलिव्ह तेल हे या आहारात उपयुक्त घटक आहेत

# कॅन्सर पेशी वाढू देत नाही..

**कॅन्सर पेशी कमी ऑक्सिजनच्या वातावरणात वाढतात. रोज चालणे, हलका व्यायाम, योग, स्ट्रेचिंग यामुळे रक्ताभिसरण सुधारते, सूज कमी होते आणि माइटोकॉन्ड्रिया (ऊर्जा केंद्रे) मजबूत होतात. डॉ. सायफ्रिड यांच्या मते, सतत हालचाल ही शरीरासाठी एक प्रकारची 'नैसर्गिक औषधं' आहे.**

### इंटरमिटेंट फास्टिंगने पेशींना विश्रांती व दुरुस्ती

■ इंटरमिटेंट फास्टिंग हा पेशींसाठी विश्रांतीचा कालावधी आहे. डॉ. सायफ्रिड यांच्या मते, इंटरमिटेंट फास्टिंगमुळे इन्सुलिन कमी होतं, 'ऑटोफॅजी' (पेशींची स्वच्छता) सुरू होते आणि केटोन निर्मिती वाढते. उदाहरणार्थ, सकाळी १२ ते रात्री ८ या वेळेतच अन्न घेणे, उरलेला वेळ फक्त पाणी किंवा साखरविरहित पेय घेणे हा एक साधा मार्ग आहे.

### अँटीइन्फ्लमेट्री पदार्थ खा

■ अतिप्रक्रिया केलेले पदार्थ सूज वाढवतात, तर नैसर्गिक अन्न सूज कमी करतात. पालेभाज्या, बेरी फळं, हळद, लसूण, मासे, आणि ऑलिव्ह तेल हे सूजविरोधी अन्नाचे उत्कृष्ट स्रोत आहेत. डॉ. सायफ्रिड सांगतात की स्वयंपाकघर हे आपल्या आरोग्यासाठी सर्वोत्तम औषधालय असू शकतं, जर आपण योग्य निवड केली तर.

दीर्घकाळ ताणात राहिल्याने शरीरात सूज वाढते आणि प्रतिकारशक्ती कमी होते. डॉ. सायफ्रिड सुचवतात की ध्यान, खोल श्वसन, निसर्गात वेळ घालवणे, किंवा आवडत्या छंदात गुंतणे हे ताण कमी करण्याचे उत्तम मार्ग आहेत. शांत मन आणि स्थिर भावनिक स्थिती असलेलं शरीर अनियमित पेशी ओळखून त्यांचा नाश करण्यास अधिक सक्षम असतं

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## ललित प्रभाकरनंतर भाडिपा स्टारसोबत झळकणार

# महाराष्ट्राची क्रश ऋता दुर्गुळेचे बॅक टू बॅक चित्रपट

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीत सतत नवनवीन प्रयोग होत आहेत. दमदार कथा, हटके विषय आणि फ्रेश जोड्या यामुळे प्रेक्षकही या सिनेमांना पसंती देत आहेत. नुकतेच दसऱ्याच्या शुभम ुहूर्तावरही खास कलाकारांच्या एका खास चित्रपटाची घोषणा करण्यात आली. 'आली मोठी शहाणी' असं या सिनेम ाचं नाव असून, प्रेक्षकांना एक आगळीवेगळी ऑनस्क्रिन जोडी पाहायला मिळणार आहे. नोव्हेंबरमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होणार असून टीव्ही-सिनेविश्व गाजवणारी ऋता दुर्गुळे या सिनेमात मुख्य भूमिकेत झळकणार आहे. तिच्यासह 'भाडिपा' फेम अभिनेता सारंग साठ्ये मुख्य भूमिकेत आहे. सारंगने आजवर मोजक्याच सिनेमात काम केले, बऱ्याचदा त्याने कॅमेऱ्यामागे जबाबदारी सांभाळली आहे. तर ऋताने मालिका, सिनेमा आणि नाट्यविश्वात विविध कलाकृतींमध्ये काम केले आहे. 'महाराष्ट्र ाची क्रश' अशीही तिची ओळख केली जायची. सारंग आणि ऋता यांची केमिस्ट्री मोठ्या पडद्यावर कशी असेल, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. 'आली मोठी शहाणी'चे मोशन पोस्टर दसऱ्याच्या निमित्ताने रीलिज करण्यात आले.



हॅशटॅग तदेव लग्नम' या चित्रपटातून सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान यांची जोडी प्रेक्षकांसमोर घेऊन येणारे दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले ही नवी जोडी प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येत आहेत. दिलीप यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, 'लवकरच प्रेक्षकांसाठी एक मनोरंजक चित्रपट घेऊन येत आहोत. या चित्रपटाची कथा लवकरच समोर येईल. इतकं नक्की की, ऋता आणि सारंग यांच्या जोडीला प्रेक्षक भरभरून प्रेम देतील.'फाईन ब्रू प्रोडक्शन्स प्रस्तुत आणि द्रू होप फिल्म वर्क्स यांच्या सहयोगाने हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सिनेमाचे लेखन आणि दिग्दर्शन आनंद गोखले यांचे आहे. तर ईशा मूठे, श्रुती साठे आणि जयकुमार मुनोत हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. दरम्यान ऋताबद्दल सांगायचे झाल्यास, अलिकडेच ती 'आरपार' सिनेमामुळे चर्चेत आली होती. ललित प्रभाकर आणि ऋता यांच्या रोमँटिक केमिस्ट्रीचे विशेष कौतुक झाले. याशिवाय तिच्या ''ठरलंय ऋजठएतएठठ' या नाटकाची अलिकडेच घोषणा झाली, लवकरच या नाटकाचे शुभारंभाचे प्रयोग पाहायला मिळतील. तिने 'परफेक्ट पॅरेन्ट्स' या प्रोजेक्टचीही अलिकडेच घोषणा केली आहे.

## दीपिकाने इन्स्टाग्रामवर अनफॉलो करण्यावर फराह खानने सोडलं मौन



**मुंबई :** दीपिका पादुकोण आणि फराह खान यांनी इंस्टाग्रामवर एकम ेकांना अनफॉलो केले याच्या चर्चा बऱ्याच झाल्या. फराहनेच दीपिकाला तिचा पहिला सिनेमा दिलेला. फराह खानने नुकतेच तिच्या युट्यूब व्लॉगमध्ये दीपिकाच्या ८ तासांच्या शिफ्टबद्दल वारंवार चेष्ठा केल्यामुळे ती दुखावली असेल आणि त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला असेल असा समज अनेकांनी केला. त्यांच्यात नक्की काय घडले हे कोणालाच माहित नव्हते. पण आता फराहनेच यामागचे कारण अखेर उघड केले आहे.पिंकव्हिलाला दिलेल्या मुलाखतीत, फराह खान म्हणाली, 'सुरुवातीला आम्ही एकमेकांना फॉलोही करत नव्हतो. हॅपी न्यू इयर दरम्यान, आम्ही इंस्टाग्रामवर संवाद न साधण्याचा निर्णय घेतला. त्याऐवजी, आम्ही थेट मेसेज आणि कॉलद्वारे संवाद साधू असं ठरवलं. आम्ही इंस्टाग्रामवर एकमेकांना शुभेच्छाही देत नाही कारण दीपिकाला ते आवडत नाही.'फराह पुढे म्हणाली, 'तसेच, ८ तासांच्या शिफ्टबद्दल मी केलेली कमेंट चेष्ठा नव्हती, तर दिलीपला सांगण्यासाठी होती की ती आता ८ तास काम करेल, प्रत्यक्षात तो फक्त २ तास काम करतो.' चित्रपट निर्मातीने खुलासा केला की जेव्हा दुआचा जन्म झाला तेव्हा ती पहिली व्यक्ती होती जी दीपिकाला भेटायला गेली.

तिने पुढे म्हटले की सर्व काही इंस्टाग्राम आणि कॅमेऱ्यासाठी नसते.फराह खानने त्या घटनेवर मनमोकळे केले ज्यावर लोकांनी तिने आणि करण जोहरने आयुष शर्माला रेड कार्पेटवर दुर्लक्ष केले असा दावा केला होता खरेतर फराहने आयुषसोबत व्लॉगही बनवला आहे. ती म्हणाली की अशा अफावांमुळे ' लोकांम ध्ये समस्या निर्माण होऊ शकतात. सुदैवाने, परिस्थिती बिघडण्यापूर्वी मी त्यांच्याशी फोनवर बोलते. पण लोकांनी हे थांबवले पाहिजे.'

फराह खान सध्या तिच्या कुक दिलीपसोबतच्या युट्यूब व्लॉगमुळे खूप चर्चेत असते. ती वेगवेगळ्या सेलिब्रिटींच्या घरी जाऊन त्यांच्या स्पेशल पदार्थ बनवतानाचे व्हिडिओ शेअर करते.

## बॉक्स ऑफिसवर साऊथ सिनेमाचा दबदबा ; छावाचा रेकॉर्डही मोडला

**मुंबई :** वरुण धवन, 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' आणि ऋषभ शेट्टीचा ' कांतारा चॅप्टर १ ' हे दोन्ही सिनेमे आज प्रदर्शित झाले. या दोन्ही सिनेमांची बॉक्स ऑफिसवर जोरदार टक्कर झालीये. जाणून घेऊया या दोन्ही सिनेमांनी पहिल्या दिवशी किती कमाई केली?सॅकनिल्क रिपोर्टनुसार 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी'ने संध्याकाळी ७:१० वाजेपर्यंत ६.५ कोटी कमावले आहेत. हे आकडे अंतिम नाहीत आणि बदलू शकतात. त्याचबरोबर ऋषभ शेट्टीचा 'कांतारा' सिनेमासुद्धा बॉक्स ऑफिसवर भरघोस कमाई करतोय. ऋषभ शेट्टीने पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे की , जर कथा चांगली असेल तर प्रेक्षक आपोआप थिएटरकडे आकर्षित होतात.पाच भाषांम ध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने वरुण धवनच्या'सनी संस्कारी की तुलसी कुम ारी' सोबत बॉक्स ऑफिसवर स्पर्धा केली. कांताराने स्वतःला बॉक्स ऑफिसचा खरा राजा असल्याचं सिद्ध केलं. पहिल्या दिवशीच्या कमाईसह, चित्रपटाने २०२५ च्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपट 'छावा' चा एक मोठा विक्रम मोडला. 'कांतारा चॅप्टर १' ने पहिल्या दिवशी बॉक्स ऑफिस कलेक्शनच्या दुप्पट कमाई केली आहे. चित्रपट पहिल्या दिवशी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ४५ ते ५० कोटी रुपये कमाई करेल अशी अपेक्षा होती, पण चित्रपटाने हे आकडे ओलांडले आहेत. सॅकनिल्क रिपोर्टनुसार, 'कांतारा चॅप्टर १' ने पहिल्या दिवशी, गुरुवारी ४७ कोटी रुपये कमाई केली. सकाळी ७ वाजेपर्यंतचा हा चित्रपटाचा आकडा आहे. सकाळपर्यंत चित्रपटाचा अंतिम कलेक्शन ६० ते ७० कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे ऋषभ शेट्टीचा सिनेमा 'ॲनिमल' आणि 'जवान' सारख्या सिनेमांच्या पहिल्या दिवशीच्या कमाईला मागे टाकेल.दरम्यान, 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या सिनेमाबद्दल सांगायचं तर या सिनेमात वरुण धवनसोबत जान्हवी कपूर, रोहित सराफ आणि सान्या मल्होत्रा यांच्याही मुख्य भूमिका आहेत.



# आता एकही चूक खपवली जाणार नाही

## प्रिया मराठेच्या निधनाला एक महिना पूर्ण होताच शंतनू मोघे व्यक्त

**मुंबई** : अभिनेत्री प्रिया मराठी हिच्या अकाली निधनामुळे संपूर्ण मराठी मनोरंजन सृष्टीला मोठा धक्का बसला होता. तिचे असे अकाली निघून जाणे अजूनही कुणाला खरे वाटत नाही. केवळ मराठीच नव्हे तर तिने हिंदी प्रेक्षकांचीही मन जिंकून घेतली होती. आज प्रिया मराठेला देवाज्ञा होऊन एक महिन्याचा कालावधी उलटला. या काळात अनेकांनी तिचा नवरा शंतनू मोघेला मानसिक आधार देण्याचा प्रयत्न केला. शंतनु ज्याप्रकारे प्रियाच्या पाठीशी या कठीण काळात खंबीरपणे उभा होता त्यासाठी अनेकांनी त्याचे कौतुकही केले.

आता प्रियाच्या निधनाला एक महिना झाल्यानंतर शंतनू मोघेने स्मरणार्थ एक पोस्ट शेअर केली आहे. तसेच या काळात ज्यांनी आधार दिला त्यांचे त्याने आभारही मानले आहेत.

शंतनू मोघे यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, ही एक कृतज्ञता व्यक्त करणारी पोस्ट आहे. या काळात ज्यांनी ई-मेल, व्हाट्सअप, एक्स, ळपींरसीरा, फेसबुक आणि लाईक सारख्या वेगवेगळ्या



सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून प्रेम आणि आशीर्वाद दिले. त्या सगळ्यांचे खूप खूप आभार.प्रिया मराठे साठी कुटुंब आणि मित्र, चाहते, फॉलोवर्स, ओळखीचे आणि अनोळखी चे लोक ज्यांनी त्यांच्या भावना इतक्या उदारतेने मनमोकळेपणाने व्यक्त केल्या. त्यांच्यातला उबदार पणा, प्रामाणिकपणा, दुःख आणि काळजी व्यक्त केली.

या काळात सगळीकडून मिळालेल्या असंख्य पाठबळामुळे माझा विश्वास पुन्हा दृढ केला त्यासाठी देव तुमचे भले करून.आज एक महिना झाला, या काळातले वैयक्तिक दुःख शब्दात व्यक्त करता येणार नाही. एवढ्या प्रेमळ, आणि शुद्ध आत्म्याला मिळालेली अकाली, दुर्दैवी, अनपेक्षित एक्झिट आमच्या मनाला दुखावली गेली आहे. पण तिने असंख्य हृदयांना आपलेसे केले होते. काम, कला, प्रेम, काळजी, दयाळू पणा, वर्तन, संवेदनशीलता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वरील सर्व गोष्टींवर शेतीचे प्रेम आणि सकारात्म कता.... पुन्हा एकदा सर्वांचे आभार जे नेहमीच माझ्या पाठीशी उभे राहिले आहेत... सगळ्यांवर खूप प्रेम, आणि अंतःकरणापासून कृतज्ञता....शंतनुने पुढे देवाला सुद्धा तंबी देत लिहिले की, देवा सावध रहा, आता तुझ्याकडून एकही चूक खपवली जाणार नाही. तिथे तिची काळजी घेण्यात तिच्यावर प्रेम करण्यात जर का काही कमी जास्त झालं तर माफी नाही. माझी एंजल... काळजी घे आपण पुन्हा भेटेपर्यंत..

***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वृद्धाश्रमातील वृद्धांना भोजनासाठी डायनींग टेबल दिले भेट...




**जनसंचलन/ चिखली**

मानवसेवा प्रकल्प अंतर्गत तुकाराम आश्रय वृद्धाश्रमात, भोकर ता चिखली येथे प्रा पी जी सवडतकर यांनी सदिच्छा भेट दिली असता वृद्धाश्रमातील वृद्ध हे खाली बसून भोजन करतांना आढळून आले याची दखल घेत त्यांना भोजन करण्यासाठी दोन डायनींग टेबल व आठ खुर्ची भेट दिली आहे. वृद्धाश्रमात निराधार बेघर घरातून काढून दिलेले नातेवाईक असून त्याचा सांभाळ करण्यास असक्षम आहे अशा वृद्धाना प्रशांत डोंगरदिवे व रुपाली डोंगरदिवे हे निरंतर सेवा देत असल्यामुळे सवडतकर परिवाराच्या वतीने छोटीशी मदत भेट दिली. तसेच ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली व्दारा संचालित मानवसेवा प्रकल्प अंतर्गत कायम विनाअनुदानित तुकाराम आश्रय वृध्दाश्रम भोकर येथे वयोवृध्द आणि डिपेन्डंट व्यक्तींसाठी सर्व सोईसुविधा सह निवासी आश्रम गेल्या चार वर्षांपासून सुरु आहे. येथे गरजवंत निराधार आहेत अशा वयोवृध्द व चालते फिरते भिक्षा मागणारे आजोबा-आजी, डिपेन्डंट व्यक्ती इत्यादींसाठी या तुकाराम आश्रय वृध्दाश्रमाची सर्व प्रकरची निःस्वार्थ मोफत सेवा देणे सुरु आहे. येथील वृद्धाना भोजन करण्यासाठी प्रा पी जी सवडतकर यांनी दोन डायनींग टेबल व आठ खुर्ची देऊन मदत केली आहे. तसेच चिखली परिसरातील दान दात्यानी मोठया मनाने समोर येऊन निराधार वृद्धाच्या सेवे करिता शक्य होईल ती भरीव मदत करून निराधार वृद्धाच्या चेहऱ्यावर स्मित हास्य फुलविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन प्रा पी जी सवडतकर व युवराज भुसारी पाटील यांनी केले. तर कुठेही निराधार बेघर मुलं मुली व इतर नातेवाईक असून सुद्धा त्यांचा सांभाळत नसतील अश्या वृद्धानी ८८५५८५०३७८ या नंबर ला संपर्क करावा असे आवाहन वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांत डोंगरदिवे यांनी केले आहे.

# स्थ नारी, सशक्त परिवारफअभियानांतर्गत शेलगाव आटोळ येथे महिलांची आरोग्य तपासणी

**जनसंचलन/बुलडाणा**

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानफ्फ अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, शेलगाव आटोळ येथे महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात गर्भवती महिलांसह बालकांची तपासणी करण्यात आली. या शिबिरात एकूण ५४ गर्भवती माता, ९ बालके, ११ ईसीजी तपासण्या, ६० बीपी तपासण्या, ६८ हिमोग्लोबिन तपासण्या, ५४ एचआयव्ही तपासण्या करण्यात आल्या. तसेच २९ पीएमजेएवाय कार्ड, २५ आभाकार्ड वितरित करण्यात आले. याशिवाय २९ रुग्णांची आरबीएस तपासणीही करण्यात आली. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांना मार्गदर्शन केले. प्रसूती व स्त्रीरोग तज्ञ डॉ. अतुल पवार आणि बालरोग तज्ञ डॉ. पवन आखाडे यांनी महत्त्वपूर्ण सेवा दिली. संपूर्ण शिबिर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ऋषिकेश कणखर यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. वैद्यकीय अधिकारी डॉ. विनोद वायाळ, डॉ. सुमित पैठणे व डॉ. पल्लवी राजपूत यांच्या देखरेखीखाली शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. या उपक्रमासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच आशा गटप्रवर्तक व स्वयंसेविका यांचे विशेष सहकार्य लाभले.

# खरीप हंगामाची नजर अंदाज पैसेवारी जाहीर

**जनसंचलन/बुलढाणा**

यंदाच्या सन २०२५-२६ च्या खरीप हंगामातील जिल्ह्यातील एकूण १४२० गावातील नजर अंदाज पैसेवारी जिल्हा प्रशासनाने जाहीर केली आहे. त्यानुसार सरासरी नजर अंदाज पैसेवारी ५२ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १४२० गावे असून ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या ५८८ आहे. तर ५० पैसेपेक्षा जास्त पैसेवारी असलेल्या गावांची संख्या ही ८३२ आहे. जिल्हा प्रशासनाने ५० पैसेपेक्षा जास्त व कमी पैसेवारी असलेल्या तालुकानिहाय गावांची संख्या जाहीर केली आहे. त्यानुसार ५० पैसेपेक्षा जास्त पैसेवारी असलेल्या बुलढाणा तालुक्यातील ९८ गावाची सरासरी पैसेवारी ५४ पैसे, देऊळगाव राजा तालुक्यात ६४ गावाची सरासरी पैसेवारी ५२ पैसे, सिंदखेड राजा तालुक्यात ११४ गावाची सरासरी पैसेवारी ५५ पैसे, मोताळा तालुक्यात १२० गावाची सरासरी पैसेवारी ५६ पैसे, नांदुरा तालुक्यात ११२ गावाची सरासरी पैसेवारी ५७ पैसे, खामगांव तालुक्यात १४६ गावाची सरासरी पैसेवारी ५९ पैसे, शेगांव तालुक्यात ७३ गावाची सरासरी पैसेवारी ५३ पैसे, संग्रामपुर तालुक्यात १०५ गावाची ५७ पैसे इतकी सरासरी पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या चिखली तालुक्यातील १४४ गावाची सरासरी पैसेवारी ४९ पैसे, मेहकर तालुक्यात १६१ गावाची सरासरी पैसेवारी ४६ पैसे, लोणार तालुक्यात ९१ गावाची सरासरी पैसेवारी ४५ पैसे, मलकापूर तालुक्यात ७३ गावाची सरासरी पैसेवारी ४६ पैसे, जळगाव जामोद तालुक्यात ११९ गावाची ४९ पैसे इतकी सरासरी पैसेवारी जिल्हा प्रशासनाकडून जाहीर करण्यात आली आहे.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**

| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत


आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४





# दुसऱ्या वर्षीचा हॅलो बुलढाणा गरबा महोत्सव बुलढाणेकरांच्या हृदयात कोरला!

## बुलढाणेकर रंगले रास-गरबाच्या रंगी! वेशभूषा, नृत्याची कमाल महिला-तरुणींची तूफानी धमाल!




**जनसंचलन/ बुलढाणा**

नवरात्रीच्या अखेरच्या माळेला बुलढाण्यातील विष्णू वाडी येथील राजे लॉन गरबाच्या रंगांनी उजळून निघाले. ङ्गहॅलो बुलढाणाफ व कायस्थ कॅटर्स अँड इव्हेंट मॅनेजमेंटफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसऱ्या वर्षीचा गरबा महोत्सव थाटात पार पडला. आदिशक्तीच्या जागरासोबतच परंपरा आणि संस्कृतीची जपणूक हा महोत्सवाचा मुख्य हेतू होता. पहिल्या माळेपासूनच महिला व तरुणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध वेशभूषांमध्ये नृत्यकला सादर केली. रंगीबेरंगी पोशाख, सडसडीत नृत्याचे ठसे आणि भक्तिमय वातावरणामुळे कार्यक्रम अधिक आकर्षक ठरला. शेवटच्या माळेलाही सहभागी कलाकारांनी आपले कलागुण सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात मान्यवरांनी उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले. हा कार्यक्रम संस्कृती आणि सर्जनशीलतेचा सुंदर मिलाफ आहे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. शेवटच्या माळेनिमित्त वॉशिंग मशीन, एलईडी टीव्ही, सायकल, साउंड बार यांसारखी आकर्षक बंपर बक्षिसे सहभागी विजेत्यांना प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला मा आमदार व भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे,जिजाऊ बँकेचे उपाध्यक्ष शिवाजीराव तायडे व अर्धांगिनी, श्रीकृष्ण जेऊघाले व अर्धांगिनी, माजी नगरसेवक आकाश दळवी व अर्धांगिनी, एडवोकेट शरद राखोंडे, हॅलो बुलढाणा संपादक जितूभाऊ कायस्थ, कायस्थ कॅटर्स संचालक राजेंद्र कायस्थ सर्व परीक्षक आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालनाची जबाबदारी संजीवनी आठराळे व अमोल पाटील यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी गरबा समितीतील सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले परंपरा, नृत्यकला, भक्तीभाव आणि आनंद यांचा सुंदर संगम असलेला हा गरबा महोत्सव बुलढाणेकरांच्या हृदयात अविस्मरणीय ठसा उमटवून गेला.

## धनगर समाजबांधवांचा रास्ता रोको...

**जनसंचलन/ सिंदखेड राजा**

धनगर समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची अंमलबजावणी तत्काळ करण्यात यावी, अशी मागणी करीत जिल्हाभरात धनगर समाजबांधवांनी रास्ता रोको आंदोलन केले. देऊळगाव माही, मेहकर आणि सिंदखेडराजा येथेही रास्ता रोको आंदोलन करून धनगर समाजबांधवांनी सरकारविरोधात बुधवारी तीव्र संताप व्यक्त केला. बोऱ्हाडे गेल्या १७ सप्टेंबरपासून जालना येथे उपोषणाला बसले असून, त्यांचा उपोषणाचा १६वा दिवस सुरू आहे. प्रकृती खालावल्याने तहसीलदारांनी त्यांना उपोषण सोडण्याची विनंती केली, मात्र बोन्हऱ्हाडे यांनी मागण्यांवर ठाम आहेत. सरकारने दिलेली २०१४ मधील आश्वासने आजवर पाळली नसल्याचा आरोप समाजाकडून येथे झालेल्या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले. पोलिस बंदोबस्तातच रस्त्यावर वाहने थांबवून घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनात डॉ. अलका गोडे, समाधान शिंगणे, सुनील मतकर यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. मेहकर शहराच्या बाहेर सोनाटी चौकात झालेल्या रास्ता रोको आंदोलनात महिलांचा मोठा सहभाग दिसून आला. परिसरातील गावांमधून शेकडो समाजबांधव व मेंढ्यांसह जमलेल्या या आंदोलनाने शहर ठप्प झाले. तर सिंदखेडराजा येथे बसस्थानक परिसरात झालेल्या आंदोलनामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. दोन दिवसांत सरकारने धनगर समाजाला घटनादत्त एसटी आरक्षणाचा निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा याप्रसंगी देण्यात आला. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे घेण्यात आले असले तरी समाजाची आक्रमक भूमिका कायम असल्याचे चित्र

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
हॅलो बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८